21/Aug/2019
Wed.

Topic 2

# महात्मा फुले

★ प्रस्तावना :
समाजसेवेसाठी आपले जीवन समर्पित करणारे थोर पुरुष आणि आधुनिक भारतातील अग्र्य समाज क्रांतिकारक म्हणुन महात्मा जोतीबा फुले यांना ओळखले जाते. महात्मा फुले यांनी बहुजन समाजाच्या आणि ~~अस्~~ अस्पृश्यांसाठी असणाऱ्या गुलामगिरीची आणि सामाजिक विषमतेची सर्व बंधने तोडुन सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक समतेचा दिपस्तंभ उभा केलेला आहे. शिक्षण आणि समता या दोन शब्दांमध्ये महात्मा फुले यांच्या कार्याचे वर्णन केले जाते.
सामाजिक विषमतेविरोधात प्रखरपणे लढा देवुन सामाजिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. महाराष्ट्रामध्ये सामाजिक प्रबोधनाला वेगळी दिशा देत असताना त्यांच्या जीवनात अनेक संकटे निर्माण झाली परंतु ते आपल्या ध्येयापासुन कधीही विचलित झाले नाहीत.
महात्मा फुले यांच्या विद्रोही विचार व कार्यकर्तृत्वामुळे महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा चळवळीचा एक नवीन प्रवाह सुरु झाला. अश्या आद्य समाजसुधारक महात्मा फुले यांच्या जीवनाचा आणि कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे ———

22/08/2019
Thursday

★ जीवनवृत्तांत :
महात्मा जोतीबा फुले यांचा जन्म सन 1827 मध्ये पुणे याठिकाणी झाला. त्यांचे मुळ गांव 'कटगुण' हे आहे. महात्मा फुले यांच्या कुटुंबाचे मुळ आडनाव गोरे असे होते. आणि समाजातील 12 बलुतेदारांपैकी ते एक चौगुले होते. गावातील प्रस्थापित लोकांबरोबर संघर्ष झाल्याने जोतिबांच्या पंजोबांनी पुरंदर तालुक्यातील खानवडी या ठिकाणी स्थलांतर केले.



Scanned with CamScanner

महात्मा फुले यांचे आजोबा ~~शेतिबा~~ शेटिबा यांनी कुटुंबाचे स्थलांतर पुणे या ठिकाणी केले.
महात्मा फुले यांचे आजोबा शेटिबा यांना राणोजी, कृष्णा, व गोविंद ही तीन मुले होती. घरच्या बिकट परिस्थितीमुळे या मुलांना शेळ्या राखण्याचे काम करावे लागले. त्यांचा प्रामाणिकपणा हुशारी व कष्ट करण्याची प्रवृत्ती हे पाहिल्यानंतर त्यांच्या मालकाने त्यांना फुलांचा व्यवसाय शिकवला. त्यांनी फुलांच्या व्यवसायात नावलौकिक प्राप्त केल्याने त्यांचे गोऱ्हे हे आडनाव मागे पडून त्यांना फुले या नावाने ओळखण्यात येऊ लागले. त्यांच्या व्यवसायाची किर्ती पेशवेदरबारापर्यंत पोहचल्याने त्यांना दरबारात फुले घालण्याची मान्यता मिळाली, व 35 एकर जमीन इनाम म्हणून मिळाली होती.

शेटिबांच्या मृत्युनंतर त्यांचे थोरले चिरंजिव राणोजी याने सर्व जमीन आपल्या नावावरती केल्याने. कृष्णा व गोविंद या दोघांना नंतर गरिबीचा सामना करावा लागला. गोविंदराव आणि चिमणाबाई यांना जोतिबा व राजाराम ही दोन मुले होती. जोतिबा एका वर्षाचे असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले होते. वयाच्या सातव्या वर्षी जोतिबांना खानगी पाठशाळेत घालण्यात आले. संस्कृत, व्याकरण, धर्मशास्त्र, वेद, या प्रकारचे शिक्षण त्या ठिकाणी दिले जात होते. परंतु तत्कालीन समाज व्यवस्था शिक्षणासाठी पोषक नसल्यामुळे जोतिबांना त्यांच्या वडिलांनी शाळेतून काढले. तरीही जोतिबांची शिक्षणाविषय असणारी आवड कमी झालेली नव्हती. जोतिबांच्या वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह धनकवडीचे सगडे-पाटील यांची कन्या सावित्रीबाई यांच्याशी झाला.

जोतिबांची बौद्धिक क्षमता पाहिल्यानंतर त्यांच्या शेजारी राहणारे उर्दू शिक्षक गफार बेग मुन्शी आणि लिजिट साहेब या दोघांनी जोतिबांचे शिक्षण पुन्हा सुरू करावे. असा आग्रह त्यांच्या वडिलांकडे धरला. परिणामी सन 1841 मध्ये जोतिबांना एका Scotis स्कॉटिश मिशनरी शाळेत घालण्यात आले.

तेथील मानवतावादी व विज्ञानवादी भूमिकांमुळे धर्माच्या नावाखाली सुरु असलेल्या प्रथा, परंपरा, कर्मकांड याचा अर्थ जोतिबांना समजु लागला. पाश्चात्य विचारवंतांच्या ग्रंथाचा त्यांनी अभ्यास केला. थॉमस पेन यांच्या लिखाणाचा त्यांच्यावरती विशेष प्रभाव पडला. भारतीय समाजातील जातीभेद, गुलामगिरी, स्त्री-पुरुष असमानता यामध्ये सुधारणा केल्या पाहिजेत. अशी त्यांची भूमिका निर्माण झाली.

भारतीय समाजातील परिस्थितीमध्ये बदल सुधारणा करण्यासाठी शिक्षण हाच प्रभावी मार्ग असल्याची जाणीव त्यांना झाली. त्यामधुनच त्यांनी स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार, शेतकऱ्यांसाठी आंदोलन, कामगार चळवळीची निर्मिती बहुजन समाजाला गुलामगिरीमधुन सुटका करण्यासाठी सत्यशोधक समाजाची निर्मिती अश्या अनेक प्रकारचे प्रयत्न महात्मा फुले यांनी सुरु केले. समतेच्या तत्त्वावर आधारित मानवतावादी धर्म निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. असंख्य समस्यांवरती मात करुन आपल्या कार्याशी ते एकनिष्ठ राहिले. जोतिबांच्या अभुतपुर्व योगदानामुळेच जनतेने त्यांना महात्मा ही पदवी दिली.

28/नोव्हेंबर/1890 मध्ये महात्मा फुले यांचे निधन झाले. त्यांच्या महत्त्वपुर्ण कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे —

23/08/2019 Friday (A)

**शैक्षणिक आणि सामाजिक कार्य**

महात्मा जोतिबा फुले यांनी शैक्षणिक क्षेत्रात आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे —

## महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य :

प्रस्तावना :

शिक्षण आणि ज्ञान याच सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरक शक्ती असल्याच्या निष्ठेमधुन महात्मा फुले यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. सामाजिक अधिकारांपासुन वंचित असणाऱ्या बहुजन समाजामध्ये परिवर्तन साधण्यासाठी शिक्षण हाच प्रभावी मार्ग आहे.

शिक्षण हेच सामाजिक सुधारणांसाठी आवश्यक असणारे प्रभावी साधन आहे. अशा प्रकारची शिक्षणाविषयीची जाणीव महात्मा फुले यांनी ओळखल्यामुळे त्यांनी शिक्षण प्रसाराच्या कार्याला प्राधान्य दिले होते. ते पुढीलप्रमाणे ___

2017 / 2019

## स्त्री शिक्षणाचे कार्य :

दारिद्र्य व अज्ञान यामध्ये जीवन जगणाऱ्या समाजाचे परिवर्तन हे केवळ शिक्षण प्रसारामुळेच घडून येईल या उद्देशाने महात्मा फुले यांनी विशेषतः स्त्री-शिक्षण व अस्पृश्यांसाठी शिक्षण देण्याचे कार्य हाती घेतले होते. जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी या तत्त्वाचे महात्मा फुले पाईक होते. स्त्री-शिक्षणासंबंधी समाजामध्ये अनेक बंधने, प्रथा, परंपरा स्त्रियांवर लादण्यात आली होती. अशा वेळी महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी स्त्रीशिक्षणाचे कार्य हाती घेतले.

महात्मा फुले व सावित्रीबाई यांनी सदाशिवराव गोवंडे यांच्याबरोबर अहमदनगरला जाऊन फारार मॅडम यांनी सुरु केलेल्या शाळेला भेट दिली व शिक्षण प्रसाराचे कार्य समजावून घेतले. पुरुषप्रधान गुलामगिरी व जातिव्यवस्था या दुहेरी बंधनात सापडलेल्या मुलींसाठी शिक्षण देण्यासाठी महात्मा फुले यांनी सन 1848 मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात पहिली शाळा सुरु केली. स्त्री शिक्षणास सनातनवादी लोकांचा प्रचंड विरोध असताना त्यांनी स्त्री शिक्षणाचा प्रारंभ केला. मुलींना शाळेत शिकवण्यासाठी शिक्षिका मिळत नाहीत, म्हणून सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षिका म्हणून नेमले. या कार्याचा परिणाम जोतीबा व सावित्रीबाई यांना आपले घर सोडावे लागले.

मुलींची पहिली शाळा बंद पडल्यानंतर सन 1851 मध्ये पुण्यातील बुधवार पेठेत मुलींसाठी दुसरी शाळा सुरु केली. त्याच वर्षी रास्ता पेठ व 1852 मध्ये वेताळ पेठ याठिकाणी शाळा सुरु केल्या. प्रस्थापित वर्गाच्या दबावापोटी ब्रिटिश सरकार देखील स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करु शकले नाही. अशा वेळी महात्मा फुले यांनी अत्यंत प्रतिकूल



Scanned with CamScanner

केलेली आहे. त्यांच्या या परिस्थितीत स्त्री शिक्षणाची सुरुवात केलेली आहे. त्यांच्या या कार्याला काही ब्रिटिश अधिकारी व ख्रिश्चन मिशन मिशनरी यांच्याकडून सहकार्य मिळाले. ज्ञान आणि शिक्षण या माध्यमातून जोतीबांनी स्त्री शिक्षणाला एक वेगळी दिशा देण्याचे कार्य केले.

२) प्राथमिक शिक्षणाबाबत विचार :-

बहुजन समाजाची प्रगती शिक्षणाशिवाय होऊन येणार नाही, अशी ठाम भूमिका महात्मा फुले यांची होती. ब्रिटिश सरकारच्या धोरणामुळे बहुजन समाजाची शिक्षणाच्या बाबतीत दुर्दशा होत असल्याचे मत त्यांनी स्पष्ट केले. पुणे नगरपालिकेत नगरसेवक म्हणून काम करताना जोतिबांनी बाजारासाठी इमारत बांधण्याच्या प्रस्तावाला विरोध केला. तो सर्व पैसा गरिब जनतेच्या प्राथमिक शिक्षणावरती खर्च करावा, अशी सूचना केली.

भारतातील शिक्षणाचा प्रसार पाहण्यासाठी ब्रिटिश सरकारने हंटर आयोगाची स्थापना केली होती. या हंटर आयोगापुढे जोतिबांनी साक्ष दिली. किमान 12 वर्षांच्या मुलामुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे. ते मोफत दिले जावे. ही महत्त्वपूर्ण शिफारस त्यांनी केली होती.

28/08/2019 Thuesday

लोकल फंडापैकी जास्तीत जास्त रक्कम प्राथमिक शिक्षणावरती खर्च करावी. प्राथमिक शाळेंची संख्या वाढवावी. त्यासाठी सरकारने अनुदान द्यावे. हे सर्व कार्य सरकारच्या शिक्षणखात्याच्या नियंत्रणाखाली असावे, अशा अनेक महत्त्वाच्या सूचना त्यांनी हंटर आयोगापुढे मांडल्या. सन 1888 मध्ये भारत भेटीवर आलेल्या ब्रिटिश राजपुत्रासमोर भारतातील गरिब जनतेच्या शिक्षणाची असणारी गरज याविषयी त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. महात्मा फुले यांचे स्त्री-शिक्षणाबरोबरच प्राथमिक शिक्षणाविषयी असणारे विचार दूरदृष्टी यामधून निदर्शनास येते.



Scanned with CamScanner

3] उच्च शिक्षणाविषयी विचार :- ब्रिटिश सरकारने प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष करुन उच्च शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले आहेत. या धोरणावरती जोतिबा फुले यांनी टिका केली. त्यांच्या मते उच्च शिक्षणास सरकारने मदत करावी, त्याचबरोबर सर्वांना समान व सार्वत्रिक शिक्षण देण्याची जबाबदारी ब्रिटिश सरकारने स्विकारावी. कारण 1857 नंतर भारतामध्ये विद्यापिठाच्या स्थापनानंतर उच्चशिक्षण घेतलेल्या एक नवा वर्ग उदयास आला. हा वर्ग समाजातील एका विशिष्ट जातीतीलच होता. उच्च शिक्षणातुन बौद्धिक कौशल्ये व व्यावसायिक कौशल्ये असणाऱ्या स्वावलंबी व्यक्ति तयार झाल्या पाहिजेत. अशी उच्च शिक्षणाबद्दल महात्मा फुलेंची अपेक्षा होती. भारतातील प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक स्वरुपात सर्वांपर्यंत पोहचवण्यात असंख्य अडचणी येत होत्या. सरकारने प्रथम त्या दुर करव्यात. त्याचबरोबर उच्च शिक्षणावरही लक्ष द्या. हा विचार महात्मा फुले यांनी उच्च शिक्षणाविषयी व्यक्त केलेला होता.

4] शिक्षणाविषयक झिरपण्याच्या सिद्धांतावर टिका :- ब्रिटिशांनी भारतातील शिक्षणाविषयक धोरणामध्ये वसाहतवादाला व त्यांच्या योजना अधिक प्राधान्य दिले होते. ब्रिटिश सत्तेची स्थिरता दिर्घकाळ टिकवणे, प्रशासनात मदतीसाठी कारकुन वर्ग तयार करणे ब्रिटिश सत्ताविषयाचा विचार विस्तृत करणे, अश्या अनेक उद्देशांसाठी भारतीय शिक्षण पद्धतीची रचना करण्यात आलेली होती प्राथमिक शिक्षणापेक्षा माध्यमिक व उच्च शिक्षणावरील तरतुदी वाढल्याचे बहुजन समाज शिक्षणापासुन वंचित राहिला होता. उच्च जातीतील लोकांना शिक्षण दिल्यानंतर त्यांच्यापासुन ते कनिष्ठ जातीतील लोकांपर्यंत विस्तारीत होत जाईल, असा शिक्षणाविषयक झिरपण्याचा सिद्धांत ब्रिटिशांनी स्विकारला होता.

शिक्षणविषयी झिरपण्याच्या सिद्धांतामुळे समाजातील एका विशिष्ट वर्गालाच शिक्षणाची संधी लाभणार होती. बहुजन ~~समाजात~~ समाज, स्त्रिया यांना शिक्षण घेण्याची संधी कधीच मिळणार नाही. यामुळे महात्मा जोतिबा फुले यांनी शिक्षणाविषयक

मिशनऱ्यांच्या सिद्धांतावर टिका केली होती. या धोरणाचे दुष्परिणाम ब्रिटिशांना निदर्शनास आणून देण्याचे काम महात्मा फुले यांनी केले.

5] महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार :-

भारतीय लोकांमधील अज्ञान, निरक्षरता हा एक प्रकारचा अंधार आहे. या अज्ञानमय अंधारातून प्रकाश दाखवणारा एक मार्ग म्हणजे शिक्षण होय. सामाजिक सुधारणा करण्यासाठी शिक्षण हेच प्रभावी साधन आहे. अशा प्रकारची शिक्षणाविषयी जाणीव व त्याचे महत्त्व महात्मा फुले यांना झालेले होते. या जाणीवेमधूनच त्यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले होते. बहुजन समाजाला व स्त्रियांना शिक्षण मिळावे यासाठी प्रस्थापित तत्कालीन शिक्षणव्यवस्थेमध्ये बदल करण्यासाठी त्यांनी प्रखर लढा दिला. ब्रिटिश सरकार, हंटर आयोग किंवा कमिशन यांच्यासमोर शिक्षणासंबंधी महत्त्वपूर्ण सुचना केल्या. शिक्षणव्यवस्थेतील एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी नष्ट करून सर्वांसाठी शिक्षण उपलब्ध व्हावे ही महात्मा फुले यांची भूमिका होती. यासाठी बौद्धिक पातळीवर संघर्ष निर्माण करण्यात आला. त्याची सुरुवात स्त्री - शिक्षणापासून झालेली होती. ग्रामीण कनिष्ठ वर्गातील व स्त्रियांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे. शिक्षणामध्ये सत्य, नितीमत्ता, प्रगती, व्यवहार ज्ञान याला महत्त्व द्यावे. मनावरती नैतिकतेचे संस्कार झाले पाहिजेत. अशा प्रकारची शिक्षणव्यवस्था जोतिबांना अभिप्रेत होती.

सारांश :

सामाजिक व धार्मिक गुलामगिरी मधून बहुजन समाजाला मुक्त करण्यासाठी अस्पृश्यता निर्मूलनासाठी व स्त्री उद्धारासाठी शिक्षण हेच प्रभावी साधन मानून महात्मा फुले यांनी शिक्षण प्रसाराचे महत्त्वपूर्ण कार्य केले. महाराष्ट्रातील शिक्षणाला विशेषत: स्त्री-शिक्षणाला क्रांतिकारी दिशा देण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केलेले आहे.

## * महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य :-

प्रस्तावना :-

१९ व्या शतकाच्या प्रारंभी भारतात सामाजिक प्रबोधन घडून येण्यास सुरुवात झाली. समाजव्यवस्था, धर्मव्यवस्था शिक्षण, जातिसंस्था, स्त्रियांचा हक्क यांसारख्या सर्व घटकांमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने समाजसुधारणेची चळवळ सुरु झालेली होती. या चळवळीमध्ये अनेक समाजसुधारकांनी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेच्या चळवळीमध्ये आद्य समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांचे महत्त्वपूर्ण ठरलेले आहे. त्यांच्या सामाजिक कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे —

1] स्त्री-उद्धाराचे कार्य :-

तत्कालीन भारतीय समाजव्यवस्थेमध्ये विषमता, जातिभेद, स्त्रियांवरील बंधने यांसारख्या अनेक प्रथा या केवळ धार्मिक अंधश्रद्धेतूनच निर्माण झालेल्या आहेत. अशी महात्मा फुले यांची भूमिका होती. महात्मा फुले यांनी सामाजिक बंधनातून स्त्रियांना मुक्त करुन त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी स्त्री-उद्धाराचे कार्य करण्यास सुरुवात केली. याची सुरुवात शैक्षणिक कार्यापासून झाली. जनजागृतीच्या माध्यमातून स्त्रियांवरती होणारे अन्याय, अत्याचार दूर करण्याचे काम महात्मा फुले यांनी केले ते पुढीलप्रमाणे.

A] विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार :-

भारतीय समाजात बालविवाहाची प्रथा सार्वत्रिक स्वरुपामध्ये असल्याने जरठ विवाह व इतर अन्य कारणांमुळे विधवा स्त्रियांचे प्रमाणदेखील अधिक होते.

विधवा स्त्रियांवरती अनेक प्रकारची बंधने घालून त्यांना अत्यंत हीन दर्जाची वागणूक दिली जात होती. विशेषतः ब्राम्हण समाजातील स्त्रियांना तर अनेक संकटांचा सामना करावा लागत होता. अशा वेळी विधवा स्त्रियांवरील अन्याय थांबवावेत या उद्देशाने महात्मा फुले यांनी विधवा स्त्रियांच्या



Scanned with CamScanner

जीवनाला नवीन दिशा देण्यासाठी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. सन १८६४ मध्ये पुणे येथे गोखले बागेत एक विधवा पुनर्विवाहदेखील घडवून आणला होता. त्यांच्या या कार्याला प्रखर विरोधदेखील झाला होता. परंतु महात्मा फुले यांनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला.

ब) बालहत्या प्रतिबंधक गृह :-

विधवा पुनर्विवाहाची चळवळ कमी कालावधीत यशस्वी होणे, त्यावेळी अशक्य होते. विधवा स्त्रियांमध्ये एखाद्या विधवा स्त्रीचे चुकून वाकडे पाऊल पडल्यास तिच्यासमोर आत्महत्या किंवा भ्रूणहत्या याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नव्हता. अशा स्थितीमधून त्यांची मुक्तता होण्याच्या उद्देशाने महात्मा फुले यांनी सन १८६३ मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली होती. या ठिकाणी येणाऱ्या मुलींची व विधवा स्त्रियांची योग्य पद्धतीने एखाद काळजी घेतली जात होती. याच बालहत्या प्रतिबंधक गृहातील काशीबाई या विधवा स्त्रीचा मुलगा यशवंत याला महात्मा फुले यांनी दत्तक घेतले होते. त्यांच्या या कार्यावरून त्यांच्या दूरदृष्टीची प्रचिती येते.



Scanned with CamScanner

5/09/2018
Thursday

c) स्त्री-मुक्तीसाठी तत्त्वसंघर्ष :-

महाराष्ट्रामध्ये १९ व्या शतकामध्ये स्त्री सुधारणा चळवळ सुरु झाली. स्त्री-शिक्षण, विधवा पुनर्विवाह यांसारख्या प्रश्नांवरती चर्चा होऊ लागली. यामधूनच स्त्री स्वातंत्र्याचा प्रश्न देखील मांडण्यात येऊ लागला. महात्मा फुले यांच्या स्त्री उद्धाराच्या कार्यामुळे व विचारांमुळे स्त्री मुक्तीच्या क्रांतिकारी विचारांना एक दिशा मिळाली. महात्मा फुले यांच्या कार्याची प्रेरणा आणि मार्गदर्शन यामधून ताराबाई शिंदे व पंडिता रमाबाई यांनी स्त्री-मुक्तीच्या लढ्याला सुरुवात केली. ताराबाई शिंदे यांनी १८८२ मध्ये स्त्री-पुरुष तुलना हा ग्रंथ लिहिला, तर रमाबाई पंडित यांनी शारदा सदन मधून स्त्री-शिक्षणाचे कार्य सुरु केले. स्त्री-पुरुष विषमतेला जबाबदार असणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृती व ब्राम्हणी धर्माच्या विरोधात संघर्षास सुरुवात करुन महात्मा फुले यांनी स्त्री-मुक्तीचा लढा निर्माण केला.

वरील प्रकारचे महात्मा फुले यांनी स्त्री उद्धाराचे केलेले कार्य युगप्रवर्तक असे ठरलेले आहे.

2) अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य :-

भारतात अस्पृश्यता ही वंशपरंपरेने चालत आलेली अनिष्ट प्रथा होती. १९ व्या शतकामध्ये याची तीव्रता अधिक जाणवत होती. अस्पृश्य समाजावरती सामाजिक, धार्मिक, सार्वजनिक बंधने लादण्यात आलेली होती. उपेक्षित जीवन जगणाऱ्या अस्पृश्य समाजाला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी महात्मा फुले यांनी विशेष प्रयत्न केले.

अस्पृश्यांना त्यांच्या हक्कांची जाणिव व्हावी यासाठी शिक्षण या माध्यमाचा महात्मा फुले यांनी प्रसार केला. सन 1852 मध्ये अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा सुरु केली. सन 1853 साली आपल्या मित्रांच्या सहकार्याने 'महार, मांग इत्यादी लोकांस विद्या शिकवण्याकरिता मंडळी' या नावाने संस्था स्थापन केली. अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्यासाठी प्रवेश दिला जात नव्हता, अशा वेळी जोतिबांनी आपल्या

राहत्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला होता.
महात्मा फुले यांनी काही कामांचे कंत्राट घेतले होते. त्यामुळे त्या ठिकाणी काम करणाऱ्या मजुरांचे जीवन त्यांना अत्यंत जवळून पाहता आले. त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न सुरु केले. गुलामगिरी हा ग्रंथ लिहून जातिव्यवस्थेवरती टिका केली. ब्राम्हणांच्या गुलामगिरीमधून या समाजाला मुक्त करण्यासाठी 'ब्राम्हणांचे कसब' हे पुस्तक लिहिले. महात्मा फुले यांनी अस्पृश्य लोकांना शिक्षणाची संधी देवून त्यांना त्यांच्या हक्कासाठी जागृत करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले.

6/09/2019 Friday

(3) शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य :-
कृषी प्रधान भारतीय समाजाचा प्रमुख घटक असणाऱ्या शेतकऱ्यांची स्थिती मात्र या काळात अत्यंत दयनीय हलाखिची झालेली होती. सावकार लोकांकडून शेतकऱ्यांचे शोषण केले जात होते. अश्या शोषित शेतकऱ्यांच्या जीवनात बदल करण्याचा निश्चय महात्मा फुले यांनी केला. यासाठी त्यांनी शिक्षणाचा पुरस्कार केला. महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसुड' या ग्रंथात शिक्षणाच्या अभावामुळे शेतकऱ्यांची दुर्दशा कशी झालेली आहे. याचे वर्णन त्यांनी पुढीलप्रमाणे केलेले आहे.

विद्येविना मती गेली; मतीविना निती गेली
नितीविना गती गेली; गतीविना वित्त गेले
वित्ताविना शुद्र खचले; इतके अनर्थ एका अविद्येने केले.

शिक्षणाच्या अभावामुळे सामान्य शेतकरी समाजाचा कसा अनर्थ घडून आलेला आहे. याच्याकडे त्यांनी लक्ष वेधले. शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण द्यावे. सरकारने त्यासाठी विशेष प्रयत्न करावे. वसतिगृहांची स्थापना करावी. व्यवसायिक स्वरुपाचे शिक्षण द्यावे. कनिष्ठ वर्गातील लोकांना नोकरीमध्ये प्राधान्य द्यावे, अशा सुचना त्यांनी सरकारला केल्या होत्या.
शेतीसाठी जास्तीत जास्त सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देणे. पिक संरक्षणासाठी शेतकऱ्यांना बंदूक बाळगण्याची परवानगी देण्यात यावी. शेतीवर योग्य कर आकारला जावा.

शेतीविषयक माहिती देणाऱ्या लहान पुस्तिका छापाव्यात. शेती करण्याची पद्धत व अवजारे यामध्ये बदल करावा. अशा सूचनादेखील त्यांनी सरकारला केल्या होत्या.

सन 1888 मध्ये इंग्लंडचा राजकुमार ड्यूक ऑफ कॅनॉट भारतभेटीवर आले असताना शेतकऱ्यांच्या पोशाखात त्यांच्या भेटीला जाऊन शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांच्यासमोर मांडले होते.

महात्मा फुले यांनी अज्ञानी व दारिद्र्यामध्ये जीवन जगणाऱ्या लोकांच्या उद्धारासाठी कार्य केलेले आहे.

4) कामगार किंवा मजूर चळवळीचा उदय :-

महात्मा जोतिबा फुले यांच्या विचारांमधून निर्माण झालेली मानवी हक्कांची चळवळ कामगारांच्या मध्येही जाऊन पोहोचली. सन 1853 नंतर मुंबईमध्ये अनेक कारखान्यांची निर्मिती झाली. या कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची संख्या वाढत गेली. त्याबरोबरच त्यांचे शोषण करण्यास सुरुवात झाली. या शोषणाविरोधात मुंबईमधील कामगारांची चळवळ निर्माण करण्याचे कार्य महात्मा फुले व त्यांचे सहकारी नारायण लोखंडे यांनी केले. 'बॉम्बे मिल हॅण्ड्स असोसिएशन' ही पहिली चळवळ यामधून उदयास आली. शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न सोडविण्याचे काम या संघटनेच्या माध्यमातून करण्यात आले.

5) वाङ्मयीन कार्य :-

महात्मा जोतिबा फुले यांनी बहुजन समाजाचे प्रबोधन व अस्पृश्य मुक्तीचा प्रचार शिक्षण यांसारख्या अनेक विषयांवरती लिखाण केले. बहुजन समाज म्हणजेच शेतकरी कष्टकरी दलित स्त्रिया हेच महात्मा फुले यांच्या विचारांचे आणि लिखाणांचे केंद्रबिंदू होते. महात्मा फुले यांचे काही महत्त्वपूर्ण ग्रंथ पुढीलप्रमाणे —

* त्रितीय रत्न (नाटक)
* छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा
* ब्राम्हणांचे कसब
* गुलामगिरी
* शेतकऱ्यांचा आसुड
* सार्वजनिक सत्य धर्म
* इशारा
* सत्सार (नियतकालिका)
* अस्पृश्यांची कैफियत

महात्मा फुले हे संशोधक पंडित व भाषाशास्त्रज्ञ देखील नव्हते. परंतु ते मुलगामी विचारवंत होते. आपल्या विद्रोही विचाराने व कर्तृत्वाने महाराष्ट्रात सामाजिक प्रबोधनाचा एक नवीन प्रवाह त्यांनी घडवुन आणला. दलित मुक्तिसाठी व बहुजन समाजाचे प्रबोधन करण्यासाठी त्यांनी लिखाण केलेले होते.

ब) राजकिय कार्य :-

महात्मा जोतिबा फुले यांना समाजातील सर्व प्रकारच्या गुलामगिरीचा प्रचंड तिरस्कार वाटत होता. भारतातील ब्रिटिशांची राजकिय गुलामगिरी देखील जोतिबांना मान्य नव्हती. ही ब्रिटिश राजवट उचलुन टाकण्याच्या उद्देशाने त्यांनी सुरुवातील 'लहुजी बुवा मांग' यांच्याकडुन नेमबाजी, दांडपट्टा इ. शिक्षण घेतले होते. परंतु ब्रिटिशांचे राज्य उचलुन टाकणे हे तेवढे सोप्पे काम नाही. याची जाणीव झाल्यामुळे जोतीबांनी हा मार्ग सोडुन दिला.

सामाजिक विषमता नष्ट केल्याशिवाय ब्रिटिशांच्या गुलामगिरिमधुन आपण मुक्त होणार नाही. याची जाणीव झाल्यामुळे महात्मा फुले यांनी बहुजन समाजावर लादलेल्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक गुलामगिरीचे उच्चाटन करण्याचे कार्य सुरु केले. इंग्रजांच्या शैक्षणिक धोरण व इतर सुधारणांमुळे जोतिबांना त्यांच्याविषयी सहानुभुती वाटत असली तरी ब्रिटिश प्रशासनावर कठोर टिका केली होती.

सन 1885 मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेला जोतिबांनी प्रखर विरोध केला. कारण त्यांच्यामते त्या ठिकाणी केवळ वरिष्ठ वर्गातील लोकांच्या हिताचाच निर्णय घेतले जात होते. सन 1889 मध्ये मानकिय राष्ट्रीय सभेचे मुंबई निर्णय घेतले जात होते. मध्ये जे अधिवेशन झाले त्या ठिकाणी जोतिबांनी असे म्हटले होते, कि जोपर्यंत शेतकरी बहुजन समाजाला या राजकिय प्रवाहामध्ये सामावून घेतले जात नाही तोपर्यंत या सभेला राष्ट्रीय सभा म्हणून घेण्याचा कोणताही अधिकार नाही. सामाजिक सुधारणा - बरोबरच राजकिय क्षेत्र त्यामधील सुधारणा यावरती देखील महात्मा फुलेंनी आपले विचार व्यक्त केले होते.

7] धर्मविषयक कार्य :-

महात्मा फुले यांच्यावरती ईश्वर आणि धर्म याविषयी काही संस्कार झाले असले तरी त्यांनी एकेश्वर धर्म अभिप्रेत होता. महात्मा फुले यांनी ईश्वराला निर्मिक असे म्हटले होते. त्यांना मुर्तीपुजा मान्य नव्हती. पाप, पुण्य, धार्मिक विधी, कर्मकांड यावरती देखील त्यांनी टिका केली होती. जोतिबांच्या मते धर्म हा मानवाच्या प्रगतीला पोषक असा पाहिजे. 'सर्व सादी जगतपती, त्याला कोण मध्यस्थी' हे त्यांच्या धर्मविषयी विचारांमधील प्रमुख सूत्र होते. महात्मा फुले यांना 'सार्वजनिक सत्य धर्म' अपेक्षित होता. सत्य धर्म हा समता व मानवता यावरती आधारित असला पाहिजे. या धर्मामध्ये कोणी कोणाचे शोषण करणार नाही. अशा सार्वजनिक सत्य धर्माचा जो मानवधर्मावर आधारित आहे याचा पुरस्कार महात्मा फुले यांनी केला होता.



Scanned with CamScanner

सारांश :-

बहुजन समाजाची सर्व प्रकारच्या गुलामगिरीमधून सुटका करण्यासाठी महात्मा फुले यांनी सामाजिक प्रबोधनाचे जे कार्य केले, ते कार्य युगप्रवर्तक असे ठरलेले आहे; त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊनच सामान्य जनतेने त्यांना महात्मा ही पदवी दिलेली आहे.

## B) सत्यशोधक समाज :-

* प्रस्तावना :-

महात्मा फुले यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. या कालावधीत आधुनिक शिक्षणाचा प्रसार पाश्चात्य संस्कृती, आधुनिक विचारसरणी यामुळे महाराष्ट्रात सामाजिक प्रबोधन घडून येण्यास सुरुवात झाली. सामान्य लोकांमध्ये सामाजिक कर्तव्याची भावना जाणिव निर्माण झाली. अशा परिस्थितीमध्ये महात्मा जोतिबा फुले यांनी गुलामगिरी व ब्राह्मणांचे कसब या ग्रंथामधून क्षुद्र व बहुजन समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचारा विरोधात कठोर टिका केली. समाजातील वरिष्ठ वर्गाच्या म्हणजेच ब्राम्हणांच्या वर्चस्वाखाली गुलामासारखे जीवन जगणाऱ्या क्षुद्र, अतिशुद्र व बहुजन समाजाचे प्रबोधन करुन त्यांना जातिव्यवस्थेविरोधात संघटित करण्यासाठी संस्थात्मक पाया देण्याची गरज होती, कारण भारतीय समाजातील हे वरिष्ठ जाती स्वतःहून आपले हितसंबंध सोडून देण्यास तयार होणार नाहीत त्या विरोधात संघटितपणे संघर्ष करण्यासाठी परंपरागत समाजव्यवस्था बदलण्यासाठी एका संघटनेची गरज होती. त्यातूनच सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. सत्यशोधक समाजाची स्थापना त्यांची भुमिका व कार्य पुढीलप्रमाणे —

1) सत्यशोधक समाजाची स्थापना :-

महात्मा जोतिबा फुले यांच्या सामाजिक कार्य व विचारधारेमधून यांचे वैचारिक सख्य वाढणारे काही सरकारी कार्यकर्ते निर्माण झालेले होते. अशा लोकांना महात्मा फुले यांनी पुणे या ठिकाणी एकत्र बोलवून सभा पार पाडली. त्या ठिकाणी सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी एखाद्या संघटनेची गरज का आहे. याचे महत्त्व लोकांना पटवून दिले. शिक्षणापासून वंचित असणाऱ्या व सामाजिक धार्मिक गुलामगिरीत जीवन जगणाऱ्या लोकांसाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता हे विचार रुजवण्यासाठी त्यांची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी महात्मा फुले यांनी

13/09/2019 दिवस

२४ सप्टेंबर 1873 मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. बहुजन समाजात वरिष्ठ वर्गाच्या गुलामगिरीमधून मुक्त करण्यासाठी स्थापन केलेली सत्यशोधक समाज ही एक चळवळ होती. सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष म्हणून जोतिबांची निवड करण्यात आली होती. नारायण वडलक यांची सचिव म्हणून नेमणूक करण्यात आलेली होती. या सभेमध्ये सत्यशोधक समाजाचे काही नियम करण्यात आले. जातिव्यवस्थे-विरोधात संघटितपणे संघर्ष करण्यासाठी शूद्र, अतिशूद्र, बहुजन समाजात प्रबोधन करण्यासाठी एक संघटनात्मक ताकद म्हणून सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात आली होती.

2) सत्यशोधक समाजाची तत्वे :-

सामाजिक व धार्मिक गुलामगिरी नष्ट करणे, हे या समाजाचे मुख्य उद्दिष्ट्ये होते. सार्वजनिक सत्यधर्म, ब्राह्मणांचे कसब, गुलामगिरी या ग्रंथामधून समाजाविषयी जोतिबांनी आपले विचार व्यक्त केलेले होते. 'सर्व साक्ष जगत्पती। त्याला नकोच मध्यस्थी' हे सत्यशोधक समाजाचे ब्रीदवाक्य होते. सत्यशोधक समाज ही चळवळ, एकेश्वरवादी असला तरी इतर संघटनांपेक्षा तो वेगळा होता. मानवता, बुद्धी प्रामाण्यवाद, व्यक्तिस्वातंत्र्य या मूल्यांवरती आधारित सत्यशोधक समाजाचे



Scanned with CamScanner

तत्त्वज्ञान होते. सत्यशोधक समाज ही समाजसुधारणेसाठी सुरु झालेली महाराष्ट्रातील पहिली सुधारणा चळवळ आहे. या समाजाची तत्त्वे तत्त्वज्ञान पुढीलप्रमाणे —

1] परमेश्वर हा एक आहे. तो सर्वव्यापी, निर्गुण, निराकार आहे.
2] सर्व मानव परमेश्वराची लेकरे आहेत. त्यामुळे जातीभेद किंवा लिंगभेद मानू नये.
3] ईश्वराची प्रार्थना करण्याचा अधिकार सर्वांना आहे.
4] सत्य हाच खरा धर्म असल्याने परमेश्वराच्या प्रार्थनेसाठी मध्यस्थाची आवश्यकता नाही.
5] मनुष्याला जातीने नव्हे तर, गुणाने श्रेष्ठत्व प्राप्त होते.
6] पुनर्जन्म, कर्मकांड, जप-तप या गोष्टी अज्ञानावर आधारित आहेत.
7] सर्वांशी बंधुभावाने वागावे, दुर्बल लोकांना मदत करावी.
8] कोणताही धर्मग्रंथ हा ईश्वरनिर्मित नाही.
9] शिक्षणाचा प्रसार करावा.

सत्यशोधक समाजाची वरील तत्त्वे ज्यांना मान्य आहेत. अशा सर्व जाती-धर्मांच्या सदस्यत्व स्विकारताना पुढीलप्रमाणे — शपथ घ्यावी लागत होती. निर्मिकाशिवाय कोणत्याही इतर देवाची पूजा करणार नाही. निर्मिकाने सर्व मानवांना दिलेल्या अधिकारामध्ये बाधा आणणार नाही. श्रेष्ठ कनिष्ठांना मानणार नाही. सत्यावर निष्ठा ठेवून गरजू लोकांना मदत व शिक्षण प्रसारासाठी कार्य करेन निर्मिकाची भक्ती धार्मिक विधी करताना मी मध्यस्थ ठेवणार नाही.

सत्यशोधक समाजाची तत्त्वे अनेकांना मान्य असल्यामुळे या समाजाच्या अनेक शाखा स्थापन झाल्या. समाजाच्या वतीने जे कार्य करण्यात आले ते पुढीलप्रमाणे —

3] सत्यशोधक समाजाचे कार्य :-

समाजातील बहुजन लोकांची शोषणाची व्यवस्था बंद करून त्यांना गुलामगिरीमधून मुक्त करणे व समाजात समता प्रस्थापित करणे हे या समाजाचे प्रमुख उद्दिष्ट होते. यानुसार सत्यशोधक समाजाकडून केले गेलेले कार्य पुढीलप्रमाणे —

i) ब्राम्हणी वर्चस्वाविरोधात चळवळ :-

सत्यशोधक समाजाने स्थापनेपासूनच मोठ्या जोमाने व उत्साहाने कार्य केलेले आहे. उच्च वर्णियांकडून अस्पृश्य समाजाला अत्यंत हीन दर्जाची वागणूक दिली जात होती अशा अस्पृश्य वर्गात त्यांचे अज्ञान, निरक्षरता व गुलामगिरी नष्ट करण्यासाठी जोतिबांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. ब्राम्हण वर्गाने मक्तेदारी निर्माण केलेली होती. त्यांची स्वार्थी प्रवृत्ती व बहुजन समाजावरील प्रभाव याविरोधात आवाज उठवण्याचे कार्य सत्यशोधक समाजाने केले. धर्माच्या नावावर कर्मकांडाचे महत्त्व वाढवून समाजातील बहुजन समाजाची दिशाभूल करणाऱ्या ब्राम्हण वर्गावर प्रखर टिका करण्यात आली. पुरोहिता शिवाय लग्न कार्य पार पाडण्याची मोहिम सुरु केली.

याचा परिणाम बहुजन समाजावरील ब्राम्हण पुरोहित या वर्गाचे वर्चस्व कमी होवू लागले.

18/09/2
Wed.

2) बहुजन समाजासाठी कार्य :
१९ व्या शतकापर्यंत बहुजन समाजावरती अनेक बंधने घालून त्यांचे शोषण केले जात होते, अशा बहुजन समाजाला सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व आर्थिक गुलामगिरीतुन मुक्त करण्यासाठी सत्यशोधक समाजाने कार्य केले.
बालविवाह, बहुविवाह, केशवपन, अंधश्रद्धा, कर्मकांड यांवरती कठोर टिका केली. विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, दारुबंदी, स्वदेशी वस्तुंचा वापर इ. या समाजाने पुरस्कार केला.

3) अस्पृश्य उद्धाराचे कार्य :
सत्यशोधक समाजाने जातिभेद व अस्पृश्यता निर्मुलनाचे कार्यदेखील केले. उच्च वर्णीयांकडून अस्पृश्य समाजाला अत्यंत हीन दर्जाची वागणुक दिली जात होती. अनेक प्रकारची बंधने त्यांच्यावरती घालून समाजामध्ये अस्पृश्यांची सर्व बाबतीत उपेक्षा केली जात होती. अशा अस्पृश्य वर्गात त्यांचे अज्ञान, निरक्षरता व गुलामगिरी नष्ट करण्यासाठी जोतिबांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. अनेक ठिकाणी शाळा सुरु करण्यात आल्या सार्वजनिक पाणवठ्यावर त्यांना प्रवेश मिळावा यांसाठी प्रयत्न केले. या माध्यमातुन सत्यशोधक समाजाने अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य केले.

4) शैक्षणिक कार्य :
शिक्षण व्यवस्थेपासुन वंचित असणाऱ्या दलित व पिडीत समाजात शिक्षण प्रसाराचे कार्य करण्यासाठी महात्मा फुले व सत्यशोधक समाजाने विशेष प्रयत्न केलेले आहेत. भारतातील शिक्षण प्रसाराचा आढावा घेण्यासाठी ब्रिटिशांनी 'हंटर आयोग' स्थापना केली होती. सन १८८२ मध्ये या आयोगासमोर जोतिबांनी साक्ष दिली. त्यामध्ये ते असे म्हणाले होते कि, सरकार गरिब शेतकऱ्यांकडून जो कर वसूल करते तो सर्व कर वरिष्ठ वर्गाच्या शिक्षणावरती खर्च केला जातो. वरिष्ठ वर्ग केवळ स्वतःचाच विचार करतो. यासाठी सरकारने कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजेल.



Scanned with CamScanner

बारा वर्षाखालील मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले पाहिजेल.

शिक्षणाच्या माध्यमातुन प्रगतीचे विचार नैतिकतेचे संस्कार मिळाले पाहिजेत. अश्या शिक्षणपद्धतीचा त्यांनी पुरस्कार केला. नगरपालिकांनी स्वखर्चाने शिक्षणप्रसारचे कार्य करावे अश्या प्रकारचे विचार या समाजाकडुन मांडण्यात आले. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातुन शिक्षण प्रसारासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

19/09/2019
Thursday

3) शेतकरी व कामगार वर्गासाठी कार्य.

दारिद्र्य, अज्ञान व मागासलेपणा यामध्ये जीवन जगणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातुन प्रयत्न करण्यात आले. शेतकऱ्यांच्या मुला-मुलींना शिक्षण द्यावे, नोकरी मध्ये प्राधान्य द्यावे. व्यावसायिक शिक्षणाची व्यवस्था करावी. अशा सुचना त्यांनी वेळोवेळी ब्रिटिश प्रशासनाला केल्या होत्या. शेतकऱ्यांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करुन अन्यायाविरोधात संघर्ष करण्यासाठी प्रवृत्त करण्याचे काम महात्मा फुले व सत्यशोधक समाजाने केले.

शेतकऱ्यांचा आसुड हा शेतकऱ्यांच्या अवस्थेचे वास्तव वर्णन करणारा महत्वपुर्ण ग्रंथ लिहिला. ब्राम्हणी वर्चस्वाविरोधात जुन्नर मधील शेतकऱ्यांनी जो लढा उभा केला. त्या पाठीमागे सत्यशोधक समाजाचा मुख्य सहभाग होता. एकुणच सत्यशोधक समाजाच्या माध्यमातुन शेती, शेतकरी यांच्या प्रगतीसाठी बीज रोपण्यासाठी सत्यशोधक समाजाने कार्य केले.

याशिवाय सामान्य कामगार लोकांवरती होणाऱ्या अन्याय अत्याचार विरोधात सत्यशोधक समाजाने सर्वप्रथम संघर्ष करुन सुरु करुन केला होता. आपल्या वरील अन्यायाविरोधात लढा देण्यासाठी कामगार वर्गाला संघटित करण्याचे कार्य महात्मा फुले व सत्यशोधक समाजाने केले.

६) दिनबंधूची सुरुवात :

सत्यशोधक समाजाचे कार्य वेगाने विस्तारीत होऊ लागले. कमी कालावधीत या समाजातील सभासदांची संख्या वाढली. ब्राम्हणी वर्तमानपत्रांना त्याची दखल घ्यावी लागली. बहुतांशी वर्तमानपत्रा-तुन सत्यशोधक समाजावर टिका करण्यात येऊ लागली. या टिकेला प्रतिउत्तर देण्याच्या उद्देशाने व सत्यशोधक समाजाच्या प्रसार करण्यासाठी कृष्णराव भालेकर व महात्मा फुले यांच्या प्रयत्नातुन 1877 मध्ये दिनबंधू हे वृत्तपत्र सुरु करण्यात आले. बहुजन समाजावरील अन्याय, अत्याचाराविरोधात माहिती समाजासमोर प्रकट करण्याचे साधन यामुळे सत्यशोधक समाजाला मिळाले.

७) दुष्काळग्रस्त लोकांना मदत :

सन 1877 मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. शेतकरी मजुर यांच्यावरती मोठे संकट निर्माण झाले होते. अशा वेळी दिनबंधू या वृत्तपत्रातुन सरकारी धोरणांवरती प्रखर टिका करुन सरकारला मदत करण्यास भाग पाडण्याचे कार्य सत्यशोधक समाजाने केले. दुष्काळग्रस्त लोकांच्या मुलांना आश्रय देण्यासाठी 'व्हिक्टोरिया बालाश्रम' या आश्रमाची स्थापना करण्यात आली. सत्यशोधक समाजाकडुन समाजातुन मदत गोळा करुन ती दुष्काळग्रस्त लोकांपर्यंत पोहचवण्याचे महत्त्वाचे कार्य करण्यात आले.

★ सारांश :

सत्यशोधक समाजाची चळवळ ही कोणत्या एका विशिष्ट वर्गविरोधी नव्हती, तर बहुजन समाजात जागृती घडवुन आणणे सर्व प्रकारच्या गुलामगिरीमधुन सुटका करणे, या उद्देशाने ही चळवळ सुरु झालेली होती. शुद्र, अतिशुद्र, कामगार, शेतकरी, स्त्रिया, अशा सर्व घटकांमध्ये म्हणजेच बहुजन समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य सत्यशोधक समाजाने केले. महाराष्ट्रातील समाजसुधारणेची पहिली चळवळ म्हणुन सत्यशोधक समाजाला ओळखले जाते.



Scanned with CamScanner

10/1/19 (day)

## (C) महात्मा जोतिबा फुले यांचे विचार (विशेष संदर्भ शेतकऱ्यांचा आसुड आणि गुलामगिरी)

* प्रस्तावना :-

महात्मा जोतिबा फुले हे संशोधक पंडित किंवा भाषाशास्त्र देखील नव्हते. परंतु ते क्रांतिकारी विचारवंत होते. महात्मा फुले यांनी आपल्या विद्रोही विचाराने महाराष्ट्रात सामाजिक प्रबोधनाचा एक नवीन प्रवाह घडवून आणला. बहुजन समाजाचे प्रबोधन व अस्पृश्यमुक्तीचा प्रसारासाठी शेतकऱ्यांचे कल्याण साधण्यासाठी त्यांनी अनेक विषयांवरती लिखाण केले. शेतकरी, कष्टकरी, शूद्र हेच त्यांच्या विचारांचे आणि लिखाणाचे केंद्रबिंदू होते. महात्मा जोतिबा फुले यांनी अनेक महत्त्वपूर्ण अशा ग्रंथांची निर्मिती केली. ते पुढीलप्रमाणे—

1) तृतीय रत्न (नाटक)
2) छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा
3) ब्राह्मणांचे कसब
4) गुलामगिरी
5) शेतकऱ्यांचा आसुड
6) सार्वजनिक सत्य धर्म
7) अस्पृश्यांची कैफियत
8) इशारा
9) सत्सार (नियतकालिक)
10) दिनबंधु (सत्यशोधक समाजाचे वृत्तपत्र)

महात्मा फुले यांच्या वरील ग्रंथापैकी शेतकऱ्यांचा आसुड आणि गुलामगिरी या दोन ग्रंथांच्या माध्यमातुन महात्मा फुले यांनी व्यक्त केलेले विचार याचाच याठिकाणी अभ्यास करणे आवश्यक आहे. तो पुढीलप्रमाणे. —

25/09/2019
Tuesday
S.N. 5M

गुलामगिरी :

महात्मा जोतिबा फुले यांच्या विचारसरणीला निश्चित व ठाम अशा प्रकारचे स्वरूप प्राप्त झालेले होते. त्यांच्या कार्यामधुन व विचारांच्या चिंतनातुन जातीव्यवस्थेच्या इतिहासाचे व भविष्याचे सुत्र त्यांना समजलेले होते. जातीविद्रोहाच्या ~~विचार~~ विचारसरणीमधुनच महात्मा फुले यांच्या 'गुलामगिरी' हा ग्रंथ 1 जुन 1873 ला समाजासमोर आलेला होता. या ग्रंथामधुन शुद्र, अतिशुद्रांच्या दास्यांच्या, गुलामगिरीच्या ऐतिहासिक वेध महात्मा फुलेंनी घेतलेला आहे. ब्राम्हण समाजाचे असणारे वर्चस्व त्याविरोधात शुद्र लोकांच्या सुरु असणारा संघर्ष यांचे वर्णन या ग्रंथाच्या माध्यमातुन जोतिबांनी केलेले आहे. भारतीय इतिहास हा जाती संघर्षाचा इतिहास आहे हे सुत्र त्यांनी शोधुन काढले. पुराणांमध्ये असलेल्या 'दशावतार' कथा यांच्या आधारे त्यांनी आर्य- अनार्य संघर्षाचे विश्लेषण केले. गौतम बुद्ध बृहस्पती त्यांच्या काळापासुन संत तुकाराम व छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापर्यंत —
— चालत आलेला दास्यमुक्तीचा संघर्ष गुलामगिरी ग्रंथाच्या माध्यमातुन जोतिबांनी मांडलेला आहे. गुलामगिरी या ग्रंथातील जोतिबांचे विचार सारांश रुपात पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1] मानवी हक्कांचा विचार :

गुलामगिरी या ग्रंथातील मानवी हक्कांचा विचार हा मुख्य विचार आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांच्या पायावर भारतीय समाजाची पुनर्रचना झाली पाहीजे. ही भुमिका त्यांनी स्पष्ट केली. दास्यमुक्ती म्हणजेच गुलामगिरीतुन सुटका व मानवी स्वातंत्र्य यांचा अखंड ध्यास महात्मा फुले यांनी धरलेला होता. आर्य- अनार्य म्हणजेच ब्राम्हण व शुद्र- अतिशुद्र यांच्यातील जातिसंघर्षात ब्राम्हणी जातीची व धर्माची उत्पत्ती प्रभाव कसा होत गेला. याचे वर्णन जोतिबांनी केले. ब्राम्हणी धर्म, वर्चस्व व मानवी हक्काशी कसा विसंगत आहे. हे त्यांनी दाखवुन दिले.

२] जातिव्यवस्थेचे खंडण / निर्मुलन :-

ज्या विचारवंतांनी तत्कालिन समाजात जातिव्यवस्थेच्या खंडणाबाबत जे विचार मांडलेले आहेत. त्यामध्ये अर्वाचीन प्रगत व शास्त्रशुद्ध विचार हे महात्मा फुले यांचेच आहेत. महात्मा जोतीबा फुले यांच्या विचारांचा जातिव्यवस्थेचा विचार केवळ धार्मिक विचारसरणी असा न करता जातिव्यवस्था ही शोषणाची व वर्चस्वाची धर्मप्रणीत व्यवस्था आहे. असा केला जातो. ब्राम्हणी धर्माने वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था यांच्या समर्थनासाठी वेदांचा आधार घेतला होता. यावरती महात्मा जोतिबा फुले यांनी टिका केली. व्यवसायाधिष्ठित जातीविभाजनाचा सिद्धांत मोडुन काढण्याचे काम जोतिबांनी केले. जोतिबांच्या मते शुद्ध- अशुद्ध या तत्वावर जातिव्यवस्थेची उतरंड निर्माण झालेली आहे. जे शुद्ध व पवित्र आहेत, त्यांना विशेष अधिकार उच्च स्थान आणि जे अशुद्ध आहेत अपवित्र आहेत म्हणुन ते अस्पृश्य त्यांना समाजात कनिष्ठ स्थान अशीच समाजाच जातीची व्यवस्था आहे. या व्यवस्थेवर त्यांनी टिका केली. जातिव्यवस्थेचे खंडण हा महत्त्वाचा विचार त्यांनी या ग्रंथाच्या माध्यमातुन स्पष्ट केलेला आहे.

७) जातीय शोषणव्यवस्थेचे वर्णन :-

महात्मा फुले हे स्वतः शूद्र जातीतील असल्याने जातीच्या आधारे होणारे शोषण हे त्यांनी अत्यंत जवळून पाहिले होते. जोतिबांनी जातीच्या आधारे केला जाणारा भेदभाव, अन्याय याचा निषेध केला. जातीच्या आधारे वर्चस्व कसे निर्माण केले जाते याचे स्पष्टीकरण त्यांनी केले. पुरोहित सावकार यांच्याकडून होणाऱ्या शोषणाचे वर्णन करुन त्यावरती कठोर शब्दांत त्यांनी टिका केली. जोतिबांच्या अशा विचारसरणीमुळे जातीसंघर्षाला शोषणाविरुद्धच्या संघर्षाला दिशा ~~मिळ~~ मिळाली.

* सारांश :-

जातीव्यवस्थेविरुद्धचा कोणताही संघर्ष ब्राम्हणी धर्म वर्चस्व याच्याशिवाय पूर्ण होवू शकत नाही. त्यांच्या वर्चस्वामधुनच जातिव्यवस्थेच्या विरोधी संघर्षाला सुरुवात झालेली आहे. समाजातील वरिष्ठ, श्रेष्ठ जातींनी जाणीवपुर्वक शुद्र-अतिशुद्र समाजावर आपले वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी गुलामगिरीची शोषणाची व्यवस्था निर्माण केलेली आहे. या व्यवस्थेविरोधात संघर्ष केल्याशिवाय शुद्र समाजाला आपले अधिकार मिळणार नाहीत. अशा प्रकारचे जातीव्यवस्थेविषयी विद्रोही विचार महात्मा फुले यांनी गुलामगिरी या ग्रंथाच्या माध्यमातून समाजासमोर स्पष्ट केलेले आहेत.

२] शेतकऱ्यांचा आसुड :-

* प्रस्तावना :-

ब्रिटिश राजवटीमध्ये शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट दयनीय स्वरुपाची झालेली होती. दारिद्र्य आणि अज्ञान यांमध्ये जीवन जगणाऱ्या शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे वर्णन करणारा शेतकऱ्यांची बाजू मांडणारा 'शेतकऱ्यांचा आसुड' हा ग्रंथ महात्मा फुले यांनी सन-1883 मध्ये लिहिलेला आहे.

या ग्रंथामधुन शेतकऱ्यांच्या सामाजिक परिस्थितीचे वर्णन महात्मा फुले यांनी केलेले आहे. शेतकऱ्यांवर लादलेल्या शोषणाचे व वर्चस्ववादी यंत्रणेचे वर्णन अत्यंत मार्मीकपणे या ग्रंथामध्ये

जोतिबांनी केलेले आहे. ब्राम्हणी शोषण व्यवस्थेविरोधात शेतकरी व कष्टकरी जातींचे ऐक्य घडवुन आणण्याचा प्रयत्न करणे हीच महात्मा फुले यांची मुख्य भूमिका होती. शेतकऱ्यांचा आसुड या ग्रंथातील महात्मा फुले यांचे विचार त्यांची भूमिका यांचे वर्णन सारांशरूपाने पुढीलप्रमाणे करता येईल.

1) वसाहतवादी / ब्रिटिशांच्या धोरणावर टिका :-

वसाहतवादी अवस्था म्हणजेच ब्रिटिश भारतीय शेतकऱ्यांवर जास्तीत जास्त कर लादुन शेतकऱ्यांचे शोषण करत आहेत. सरकार शेतकऱ्यांना कसे लुटत आहे. याचे वर्णन या ग्रंथामध्ये करून ब्रिटिशांच्या या धोरणावरती जोतिबांनी कठोर टिका केलेली आहे. ब्रिटिश सरकार शेतकऱ्यांकडुन कर जमा करून त्यामधुन नोकरदारांचे पगार, पेन्शन यावरती अवाजवी खर्च करून शेतकऱ्यांचे शोषण करत आहे. हे समाजासमोर निदर्शनास आणले. जोतिबांचे ब्रिटिश सरकार-विरोधी विचार, टिका या पुस्तकांमध्ये असल्याने शेतकऱ्यांचा आसुड हे पुस्तक छापण्यास हेच्ीळ प्रकाशकाने नकार दिला होता.

2) पुरोहित शाहीच्या शोषणावर टिका :-

भारतीय समाजातील ब्राम्हणी पुरोहितशाहीने शुद्र-अतिशुद्र लोकांचे अगदी जन्मापासुन ते मृत्युपर्यंत सर्व विधी उत्सव व्रतवैकल्य ज्योतिष या आधारे कसे शोषण केलेले आहे. याचे वर्णन करून त्यावरती टिका केलेली होती. धर्म, कर्मकांड यांचे वर्चस्व शेतकऱ्यांच्या मनावरती बिंबवून पुरोहितांचा वर्ग शेतकऱ्यांची पिळवणूक करत आहे. अशी भूमिका जोतिबांची होती. ब्राम्हणी पुरोहित शाहीच्या विरोधात बंड करण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्याचे महत्त्वपुर्ण कार्य जोतिबांनी केलेले आहे.



Scanned with CamScanner

३] सावकारी शोषणावर टिका :-

रयतवारी महसूल व्यवस्थेमुळे सावकार लोकांची पकड मोठ्या प्रमाणात झालेली होती. ब्रिटिशांच्या कराचे पैसे देताना महाराष्ट्रातील शेतकरी कर्जबाजारी होत होता. अश्या वेळी सावकारांकडून शेतकऱ्यांच्या शेतजमीनी, घर, गहाण ठेवुन व्याजाने कर्ज दिले जात होते. त्या कर्जाच्या मोबदल्यात सावकार शेतकऱ्याची मालमत्ता आपल्या ताब्यात ठेवुन शेतकऱ्यांचे शोषण करत होता. या सावकारी शोषणाविरोधात प्रखर टिका करुन सावकारशाहीच्या विरोधात शेतकऱ्यांना जागृत करुन सावकारांच्या शोषणामधुन सोडवण्या साठी महात्मा फुले यांनी संघर्ष सुरु केला.

४] नोकरशाहीच्या लुटीबाबत विचार :

ब्रिटिश प्रशासनातील पोलिस, न्यायव्यवस्था व प्रशासकीय नोकरशाहीमध्ये ब्राम्हण लोकांचाच भरणा अधिक होता. ग्रामिण भागातही कुलकर्णी म्हणजेच ब्राम्हण हेच प्रभावी होते. त्यामुळे या सर्वांकडुन शेतकरी बलुतेदार या सर्व लोकांचे शोषण केले जात होते. ~~शेतकऱ्या~~ शेतकऱ्यांच्या शोषणाचे प्रमुख कारण असलेल्या ब्राम्हणी नोकरशाहीवर या ग्रंथामध्ये कडक शब्दात टिका केलेली आहे.

५] शेतकऱ्यांच्या दास्यमुक्तीसाठी लढा :-

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांना त्यांच्यावरती होणाऱ्या शोषणाच्या विरोधात दास्यमुक्तीसाठी लढा निर्माण करण्यासाठी प्रवृत्त केले. शेतकऱ्यांनी विद्या संपादन केल्याशिवाय त्यांना मुक्तीचा मार्ग मिळणार नाही. शेतकऱ्यांनी आपल्या अस्तित्वासाठी अन्याया-विरोधात लढा दिला पाहिजे. शेतकऱ्यांच्या दास्यमुक्तीसाठी शेतकऱ्यांचे प्रबोधन करण्याचे काम महात्मा फुले यांनी केले. जोतिबांच्या या वैचारिकतेमधुनच शेतकऱ्यांमध्ये विद्रोह घडुन आला.

* सारांश :

महात्मा फुले यांच्या शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथाचे सार्वजनिक वाचन गावोगावी केले जात होते. शेतकऱ्यांच्या दास्य मुक्तीसाठी शेतिव्यवस्थेत मुलगामी बदल करण्याची भूमिका जोतिबांनी घेतली. शेतीसाठीच्या पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यासाठी त्यांनी सुचना केल्या. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाविरोधात जे विचार मांडले, त्या विचारामधुनच शेतकऱ्यांच्या दास्यमुक्तीची चळवळ महाराष्ट्रात सुरु झाली. एकुणच शुद्र शेतकऱ्यांच्या हितसंबंधाची एकसुर मांडणारी ही चळवळ महाराष्ट्रात गतीमान राहिली. या सर्व घटनांच्या मागे महात्मा फुले यांची विचार परंपराच जबाबदार होती. जोतिबांच्या विचार परंपरेने व कार्य-कर्तृत्वाने महाराष्ट्रात सामाजिक बदलाच्या परिवर्तनाच्या एक प्रवाह सुरु झाला होता.

Questions.

दिर्घोत्तरी प्रश्न

1) महात्मा जोतिबा फुले यांचे शैक्षणिक कार्य स्पष्ट करा.
2) महात्मा जोतिबा फुले यांचे सामाजिक योगदान स्पष्ट करा.
3) महात्मा फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान स्पष्ट करा.
4) सत्यशोधक समाजाचे स्वरुप व कार्य स्पष्ट करा.
5) गुलामगिरी व शेतकऱ्यांचा आसुड या ग्रंथातील महात्मा फुले यांचे विचार विशद करा.
6) महात्मा जोतिबा फुले यांचे विचार स्पष्ट करा (विशेष संदर्भ शेतकऱ्यांचा आसुड आणि गुलामगिरी)

टिपा लिहा.

1) महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य
2) महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य
3) सत्यशोधक समाज
4) सत्यशोधक समाजाचे योगदान



Scanned with CamScanner

5) गुलामगिरी
6) शेतकऱ्यांचा आसूड
7) महात्मा फुले यांचे स्त्री-उद्धाराचे कार्य



Scanned with CamScanner